RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक ३१] सोमवार, मे ८, २०२३/वैशाख १८, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. व जि. ठाणे.

**अधिसूचना**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६)**

क्र.मनपा/नर/शहरी नुतनीकरण योजना प्रसिद्धी/ ३८२/२०२३-२४.

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे.) शासन निर्णय क्र. टिपीएस- १२९६/८४७/ सी.आर.-१६२/९६/नवि-१२, दिनांक १४ जून, १९९७ अन्वये मंजूर केली असून दिनांक १५ जून, १९९७ पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्भूत १३ गावांसाठीची प्रारुप सुधारित विकास योजना शासनामार्फत नियुक्त नामनिर्देशित अधिकारी, मिरा-भाईंदर विकास योजना तथा सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा यांच्यामार्फत उक्त अधिनियमाचे कलम २६(१) नुसार अधिसूचना क्र. मिभामनपा/प्रासुवियो-मिरा-भाईंदर/कलम२६/ प्रसिद्ध/२५८७, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१)(क)(क)(ग) व कलम २०(४) नुसार शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/सी.आर.-२३६/१८/वियो व प्रा.यो/ कलम ३७(१)(क)(क)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केलेली असून ती दि. ३ डिसेंबर २०२० पासून अंमलात आली असून सदर नियमावली मिरा-भाईंदर महानगरपालिकेस लागू आहे. (यापुढे "उक्त नियमावली" असा उल्लेख केलेला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर असलेल्या व जुन्या मोडकळीस आलेल्या आणि अनाधिकृत इमारतींचे नियोजनबद्ध व सुनियोजित पुनर्विकास होण्याकरिता राज्याकरिताच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. १४.८ अन्वये शहरी नुतनीकरण योजनेची (Urban Renewal Scheme) तरतूद केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.८.१ (ii)(b) च्या तरतुदीनुसार शहरी नुतनीकरण नकाशे तयार करणेचे, अधिसूचित करण्याचे आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त यांना असल्याचे नमूद आहे.

त्याअर्थी, उक्त नियमावलीच्या विनियम क्र. १४.८.१ (ii)(b) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण २४ (चोवीस) शहरी नुतनीकरण नकाशे (Urban Renewal Plan) हे मंजूर विकास योजना आणि अस्तित्वातील जमिनीचा वापर अशा स्वरुपात भागधारकाच्या सहभागाने तयार करण्यात आला असून तद्नंतर योग्य अशा सुधारणेसह खालील तक्त्यात दिल्यानुसार तयार करण्यात आले असून ते प्रसिद्ध करणे आवश्यक आहे :—

| यु.आर.पी. नं. (१) | प्रस्तावित यु.आर.पी. चे नाव (URP) (२) | मंजूर वि.यो.तील सेक्टर क्र. (३) | क्षेत्र (हे. आर.) (४) | यु.आर.पी. नं. (१) | प्रस्तावित यु.आर.पी. चे नाव (URP) (२) | मंजुर वि.यो. तील सेक्टर क्र. (३) | क्षेत्र (हे. आर.) (४) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जकुल पाडा | VI A & VII | २७.०४ | १३ | ६० फुटे रोड (भाईंदर पश्चिम) | II | २९.३८ |
| २. | माश्याचा पाडा | VII | १५.६६ | १४ | महेश नगर | II | १०.५६ |
| ३. | मांडवी पाडा | VII | १९.४७ | १५ | गणेश देवल नगर | II | ७.५९ |
| ४. | महाजनवाडी | VII | १०.४४ | १६ | मोती नगर | II | १.६० |
| ५. | पेनकरपाडा | VII | २७.७४ | १७ | शास्त्री / नेहरु नगर | II | ७.०८ |
| ६. | मुनरवी कम्पाऊंड (मिरा) | VII | ८.७६ | १८ | आंबेडकर नगर | II | ४.४९ |
| ७. | घोडबंदर गाव | VI A | ६.४२ | १९ | मुर्दे गाव | I | २८.३६ |
| ८. | गोडदेव नवघर गाव | III | २७.२४ | २० | चौक | I | २५.७६ |
| ९. | खारी गाव – कॅबिन रस्ता | III | २५.५१ | २१ | पाली | I | ४७.७८ |
| १०. | सलासर व तलाव रस्ता | III | १२.९१ | २२ | कराई पाडा | I | २६.५० |
| ११. | एस.व्हि.रस्ता, आर.एन.पी.एरिया | III | ५२.०१ | २३ | देवघी डोंगर गाव | I | ६.२० |
| १२ | जय अंबे नगर | II | २.६१ | २४ | भाटे बंदर | I | २०.५० |
| | | | | | **एकूण** | | **४५१.६८** |

(टिप : प्रत्यक्ष जागेवरील मोजणीअंती यु.आर.पी. ची हद्द व क्षेत्र कायम करण्यात येईल. )

सदर शहरी नुतनीकरण नकाशामधील (Urban Renewal Plan) हद्द दर्शविणारे नकाशे नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत कामाकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयामध्ये ३० दिवसांच्या कालावधीमध्ये उपलब्ध राहतील :—

(१) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, भाईंदर (पश्चिम) यांचे कार्यालय.

(२) सहायक संचालक, नगररचना, नगररचना विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालय.

(३) सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ६ यांचे कार्यालय.

सदर अधिसूचना व अधिसूचित नकाशे हे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

**दिलीप ढोले,**
आयुक्त तथा प्रशासक,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

भाईंदर,
दिनांक : ३ मे २०२३.

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

HEAD OFFICE, BHAINDAR (W.),
LATE INDIRA GANDHI BHAWAN, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MARG,
BHAYANDAR (W.), TQ. & DIST. THANE 401 101.

*NOTIFICATION*

**(UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966)**

Ref.No.MNP/NR/URP Publication/382/ 2023-24.

Whereas, the Development Plan of Mira-Bhaindar Municipal Corporation has been sanctioned by the Urban Development Department, Government of Maharashtra, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter referred to as the "said Act") through *vide* Notification No.TPS-1296/847/CR-162/96/UD-12, dated 14th June 1997 which has been came into force with effect from 20th June 1997 ;

Whereas, the Revised Draft Development Plan of 13 villages from Mira-Bhaindar Corporation limits has been published by State Government Appointed Nominated Officer, Mira-Bhaindar Development Plan *cum* Assistant Director of Town Planning Thane Branch in *Official Gazette* under section 26(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter referred to as the "said Act") *vide* noticiation No. MBMC/PRDP-Mira- Bhaindar/Section 26/Publication/2587, dated 27th October 2022 ;

And whereas, the Unified Development Control & Promotion Regulations (hereinafter referred to as "UDCPR") has been sanctioned by the State Government under Section 37 (1AA) (c) and section 20(*4*) of the said Act *vide* Notification No. TPS-1818/C. R-236/18/DP & RP/Sec.37(1AA) (c) and section 20(*4*)/UD-13, dated 2nd December 2020, which has been came into force with effect from dt. 3rd December 2020 ;

And whereas, it is planned and controlled redevelopment of large number of old, dilapidated, and unauthorized buildings in the Mira-Bhayandar Municipal Corporation area and it has been introduced Special Regulation provisions in respect of "Urban Renewal Schemes" under the Regulation No.14.8 of UDCPR ;

And whereas, as mentioned in the regulation No.14.8.1(ii) (b) of the said regulations that Commissioner can prepare and notify Urban Renewal Plans and revise the same, as and when required.

Therefore, as per powers conferred to me *vide* the said Regulations No. 24 (Twenty-Four) Urban Renewal Plans in the Mira-Bhaindar Municipal Corporation limits are proposed for publication after carrying out due diligence with respect to sanctioned Development Plan and Existing Land Use in the said Urban Renewal Plan and also consultation with various stakeholders and thereafter incorporating the appropriate amendments therein are enlisted hereinafter :—

| URP No. (1) | URP Name (2) | Sector No. (3) | Area (Ha.) (4) | URP No. (1) | URP Name (2) | Sector No. (3) | Area (Ha.) (4) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dajkul Pada | VI A & VII | 27.04 | 7 | Ghodbunder Village | VI A | 6.42 |
| 2 | Mashachapada | VII | 15.66 | 8 | Goddev Navghar Village | III | 27.24 |
| 3 | Mandvi Pada | VII | 19.47 | 9 | Khari Gaon – Cabin Road | III | 25.51 |
| 4 | Mahajan Wadi | VII | 10.44 | 10 | Salasar & Talao Road | III | 12.91 |
| 5 | Penkarpada | VII | 27.74 | 11 | S.V Road, RNP Park Area | III | 52.01 |
| 6 | Munshi Compound (Mira) | VII | 8.76 | 12 | Jai Ambe Nagar | II | 2.61 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 60 Feet Road – Bhainder West | II | 29.38 | 19 | Murdhe Gaon | I | 28.36 |
| 14 | Mahesh Nagar | II | 10.56 | 20 | Chowk | I | 25.76 |
| 15 | Ganesh Deval Nagar | II | 7.59 | 21 | Pali | I | 47.78 |
| 16 | Moti Nagar | II | 1.60 | 22 | Karai Pada | I | 26.50 |
| 17 | Shastri/ Nehru Nagar | II | 7.08 | 23 | Davghi Dongar Village | I | 6.27 |
| 18 | Ambedkar Nagar | II | 4.49 | 24 | Bhate Bandar | I | 20.50 |
| | | | | **Total Area** | | | **451.68** |

Note: The area will be confirmed for URP after Joint Measurement.

The Plans showing the boundaries of Urban Renewal Plans area is Kept for inspection to genral public at following offices for next Thirty Days :—

(1) The Commissioner Office, Mira-Bhaindar Municipal Corporation, Bhaindar ( West).

(2) Office of the Assistant Director of Town Planning, Town Planning Department, Mira-Bhaindar Municipal Corporation, Mira (East).

(3) offices of the Assistant Municipal Commissioners of the respective wards (1-6) of MBMC.

This Notification and Notified plans are also published on official web site www.mbmc.gov.in

DILIP DHOLE,
Commissioner and Administrator,
Mira-Bhaindar Municipal Corporation.

Bhaindar,
dated 3rd May 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.